


# कातकरी बोली

कातकरी बोली भाषेचा अभ्यास करताना असे लक्षात येते की कातकरी ही बोली संपर्कासाठी व संवाद साधण्यासाठी प्रगल्भ अशी बोली आहे. परंतु वाढत्या आधुनिकीकरणामुळे कातकरी जमातीतील मुले-मुली आपली बोली बोलण्यास फार लाजतात. या समाजातील सुशिक्षित झालेल्या तरुण पिढीला आपली बोली ही कमी दर्जाची वाटू लागली आहे. त्यामुळेच कातकरी बोली लोप पावत चालली आहे म्हणूनच या बोलीतील लोकसाहित्याचे जतन होत नाही ते लोप पावत आहे. कातकरी बोलीतील लेखी साहित्य खूप कमी प्रमाणात उपलब्ध आहे म्हणून ही बोली जतन करणे गरजेचे आहे.

कातकरी लोकांच्या मनात आधुनिकीकरणामुळे आपल्या बोली विषयी न्यूनगंड आहे. आपण जर बघायला गेलो तर सर्वच बोलींची हीच अवस्था आहे असे आपल्याला दिसून येते. म्हणूनच बोलीवर याचा परिणाम होऊन दिवसेंदिवस या बोलीचे अस्तित्व धोक्यात आहे.

कातकरी समाजातील अनेक जाती व पोटजाती यांचा समावेश होतो. कातकरी जमातीत अथावर, धेड, सिंधी, सोन, वरप असे पाच पोटविभाग आहेत. तसेच कातकरी जमातीला अनेक नावाने ओळखले जाते. कातकरी लोकांना कातवडी, कातोडी,काथोडी, काठोडी, काथकरी व काथोडीया असे म्हणतात. अशा अनेक प्रकारे व नावाने हा समाज ओळखला जातो.

कातकरी समाजातील लोक सण-उत्सव देखील साजरे करतात. ही जमात सण उत्सवाच्या वेळी त्यांचे पारंपरिक पोशाख घालतात व त्यांची पारंपरिक नृत्य आणि गाणी त्यांच्या बोली मध्ये गायली जातात. ही लोकगीते बघण्यास ऐकण्यास मधुर व गोड वाटतात. या समाजात साहित्यसंपदा देखील मुबलक प्रमाणात उपलब्ध आहे असे आढळून येते. कातकरी लोकांकडे मौखिक ठेवा मोठ्या प्रमाणात उपलब्ध असला तरी देखील ते लेखी स्वरुपात उपलब्ध नाही. त्यामुळे त्यांच्या लोक साहित्याचा, लोकगीतांचा, लोकनृत्याचा विस्तार त्यांच्यापुरताच मर्यादित आहे.

कातकरी समाजातील लोकसाहित्याचा आढावा घेतला तर त्यांची लोकगीते ही लयबद्ध असतात. त्यांतील काही लोकगीते खालीलप्रमाणे सांगता येतील.

नको आमाला गोर गोर साऱ्या गो,
आमच्या नवाऱ्या साऱ्या बऱ्या गो,
नको आमाला लाली पावडरी गो,
आमचा केसांचा अंबारा बरा गो,

अशा काहीश्या प्रकारची लोकगीते कातकरी बोली मध्ये बोलली जातात. त्यांच्या बोली मध्ये ' ल ' चा ' र ' होतो.

बोली ही तिच्या लयी मध्ये बोलली जाते. काही ठिकाणी आवाज उंचावतो तर काही ठिकाणी खाली असतो. बहुतांशी ही बोली वरच्या आवाजातच बोलली जाते. या बोलीतील लोकगीते गाताना विशिष्ट वाद्याची जोड असते. परंतु त्यांची लोकगीते बोलताना कोणत्याही मोठ्या संगीताची जोड लागत नाही. त्यांची लोकगीते त्यांच्या बोली सुरत ऐकायला मधुर वाटतात.

या बोलीत ' येथे ' या शब्दाला येतात असं म्हणतात तर चिमणीला ' चिडू ' असे म्हणतात. नंतर फुलपाखराला ' भिंगरूट ' असे म्हणतात आणि पावसाला ' पानी ' म्हणतात. असे काही शब्द या बोलीत बोलले जातात. त्यामुळे या

बोलीचा प्रसार व प्रचार करायला हवा व त्या समाजातील लोकांनी आपल्या बोलीचे व साहित्याचे संवर्धन करायला हवे.



कु.प्राची सुधीर राऊत
SYBA